# मंत्रिमंडळ निर्णय

## ३ नोव्हेंबर २०१५

## ( मंत्रिमंडळ बैठक क्र. ५४ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया-स्तनदा मातांच्या चौरस आहारासाठी डॉ. अब्दुल कलाम अमृत योजना | आदिवासी विकास |
| २ | रेशीमबाग, मलकापूर खेळांच्या मैदानाचे आरक्षण बदलाचा निर्णय | नगरविकास |
| ३ | ‘रोहयो’च्या अपूर्ण धडक सिंचन विहिरींसह वर्ग व रद्द केलेल्या विहिरीही पूर्ण करण्याचा निर्णय | रोजगार हमी योजना |

## अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया-स्तनदा मातांच्या चौरस आहारासाठी डॉ. अब्दुल कलाम अमृत योजना

अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांच्या आहारातील उष्मांक आणि प्रथिनांमध्ये वाढ करण्याबरोबरच जन्माला येणाऱ्या सुदृढ बालकांचे प्रमाण वाढविण्यासाठी सहा महिने कालावधीसाठी एक वेळचा चौरस आहार देण्यासाठी भारतरत्न ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत योजना सुरू करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

अनुसूचित क्षेत्रातील अंगणवाडी कक्षेत येणाऱ्या सर्व गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांना या योजनेनुसार एकूण सहा महिन्याच्या कालावधीसाठी एक वेळचा चौरस आहार मिळणार आहे. उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण या योजनेमुळे कमी होण्यास मदत होणार आहे. अनुसूचित क्षेत्रामधील सुमारे १ लाख ८९ हजार एवढ्या गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना या योजनेचा दरवर्षी लाभ मिळणार आहे. गरोदर स्त्रियांना शेवटच्या तिमाहीत तर स्तनदा मातांना प्रसूतीनंतर तीन महिन्यांच्या कालावधीसाठी या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

मुलांमध्ये चेतना निर्माण करण्याच्या डॉ. कलाम यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या दृष्टिकोनातून या योजनेला भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत योजना असे नाव देण्यात आले आहे. ही योजना राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यांतील ८५ एकात्मिक बाल विकास प्रकल्पांच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार आहे. योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या आहाराचा दर्जा, किंमत आणि पोषण मुल्ये ठरविण्यात आली असून चौरस आहाराचा खर्च सरासरी प्रति लाभार्थी २२ रुपये एवढा निश्चित करण्यात आला आहे. या योजनांसाठी केंद्र शासनाच्या टीएचआर योजनेचा निधी (केंद्र व राज्य हिस्सा) वापरण्यात येईल.

अनुसूचित क्षेत्रातील कुपोषण, बालमृत्यू व कमी वजनाची बालके जन्माला येणे यासारख्या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी परिणामकारक उपाययोजना राबविणे आवश्यक होते. अनुसूचित क्षेत्रामध्ये कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण ३३.१ टक्के एवढे आहे. आदिवासी स्त्रियांमध्ये गरोदरपणाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये वजनवाढीचे प्रमाण कमी असल्यामुळे त्याचा परिणाम बाळाच्या वजनावर होऊन कमी वजनाची बालके जन्माला येतात. तसेच बालकाच्या जन्मानंतर पहिले तीन महिने मूल पूर्णपणे मातेवर अवलंबून असल्यामुळे या कालावधीत मातेचे आरोग्य व पोषण चांगले राहणे आवश्यक आहे.

या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या एक वेळच्या पूर्ण आहारामध्ये चपाती अथवा भाकरी, भात, कडधान्ये-डाळ, सोया दुध (साखरेसह), शेंगदाणा लाडू (साखरेसह), अंडी अथवा केळी अथवा नाचणी हलवा, फळे, हिरव्या पालेभाज्या, खाद्यतेल, गुळ अथवा साखर, आयोडीनयुक्त मीठ, मसाला इत्यादींचा समावेश असेल. तसेच हा आहार खरेदी करण्यासाठी एका अंगणवाडीसाठी एक अशी चार सदस्यीय आहार समिती नियुक्त करण्यात येईल. या समितीला आहार घटक खरेदी करण्याचे अधिकार राहतील.

ही योजना यशस्वीरित्या राबविण्यासाठी अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांना नियमित मिळणाऱ्या मानधना व्यतिरिक्त या योजनेचा आहार तयार करण्यासाठी प्रतिमाह प्रत्येकी दोनशे पंन्नास रुपये देण्यात येतील. ही योजना आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखाली व एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या माध्यमातून राबविण्यात येणार असून योजनेंतर्गत कामाचा व फलनिष्पत्तीचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरावर आदिवासी विकास विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सनियंत्रण समिती, जिल्हास्तरावर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सनियंत्रण व अंमलबजावणी समिती स्थापन करण्यात येईल. तसेच अंगणवाडी पातळीवर महिला सरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य (अनुसूचित जमाती) यांच्या अध्यक्षतेखाली आहार समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. या योजनेचे वेळोवळी त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन करण्यात येणार आहे.

-----०-----

## रेशीमबाग, मलकापूर खेळांच्या मैदानाचे आरक्षण बदलाचा निर्णय

नागपूर महापालिका क्षेत्रातील रेशीमबाग येथील खेळाचे मैदान सार्वजनिक व निमसार्वजनिक विभागात समाविष्ट करणे आणि अकोला शहरातील मलकापूर येथील खेळाचे मैदान खुली जागा म्हणून दर्शविण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

या अधिनियमातील तरतुदीनुसार नागरी भागातील लोकसंख्येसाठी दहा वर्षे कालावधीसाठी मानकांप्रमाणे सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. यामध्ये क्रीडांगण आणि खेळाचे मैदानासाठी जागा आरक्षित केल्या जातात. या आरक्षणाच्या संरक्षणासाठी राज्याच्या क्रिडा धोरणात खेळाच्या मैदानावरील अतिक्रमणे नियमित करण्यात येऊ नये, तसेच आरक्षण बदलासाठी मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची तरतूद करण्यात आली आहे.

नागपूर शहराच्या सुधारित विकास योजनेनुसार, नागपूर येथील रेशीमबाग खेळाचे मैदान दर्शविलेली जागा आणि आरक्षणाचे नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महापालिका दर्शविण्यात आले आहे. फेरबदलाखालील जागेच्या दक्षिणेकडील जागा नागपूर सुधार प्रन्यासने हेगडेवार स्मारक समितीला भाडेपट्टीवर दिली आहे. पूर्वस अंतर्गत रस्ता व त्यापलीकडे निवासी क्षेत्र, उत्तर दिशेस ३० मीटर रेशीमबाग रस्ता आहे. या मैदानापैकी १२२१५.९५ चौरस मीटर क्षेत्र रेशीमबाग क्रिडांगणातून वगळून कम्युनिटी सेंटरसाठी आरक्षित केली आहे. या जागेच्या उत्तर-पूर्व कोपऱ्यातील जागा आणि सध्याच्या खेळाच्या मैदानाच्या दक्षिण-पूर्व कोपऱ्याच्या दक्षिणेकडील मिळकत सार्वजनिक, निमसार्वजनिक विभागात समाविष्ट केली आहे. या दोन जागांमधील एक पट्टीसदृश जागा असल्याने तिचा समावेश सार्वजनिक, निमसार्वजनिक विभागात नियोजनाच्या दृष्टीने होणे गरजेचे आहे.

या फेरबदलाबाबत नागपूर महापालिकेच्या ३० ऑक्टोबर २००९ च्या सर्वसाधारण सभेत या खेळाचे मैदान विभागातून वगळून मुक्त होणारी जागा सार्वजनिक व निमसार्वजनिक विभागात समाविष्ट करण्याबाबत ठराव पारीत करण्यात आला आहे. त्यानुसार शासनाकडे हा प्रस्ताव कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला. संचालक नगररचना यांच्या सल्ल्यानुसार या फेरबदलाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयानुसार आता रेशीमबाग खेळाच्या मैदानापैकी ४०१३.३७ चौरस मीटर जागा वगळण्यात येणार असून मुक्त झालेली जागा सार्वजनिक, निमसार्वजनिक विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

अकोला शहराच्या वाढीव क्षेत्राची विकास योजनेमधील मलकापूर येथील ०.७१ हेक्टर क्षेत्रावर खेळाचे मैदान दर्शविण्यात आले होते. या आरक्षणाच्या जागेवर विकास योजना तयार होण्यापूर्वीच अभिन्यास (ले-आऊट) मंजूर आला होता. या ले-आऊटमधील १५ टक्के खुल्या जागेवर स्वामी विवेकानंद शाळेचे बांधकाम, मंदिर आणि पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे. या ले-आऊटमधील काही निवासी भूखंडांवर बांधकाम करण्याची परवानगी नियोजन प्राधिकरणाकडून देण्यात आली आहे. यामुळे खेळाच्या मैदान विकसित करता येत नसल्याने क्रिडांगणाचे आरक्षण वगळणे अत्यावश्यक आहे. याबाबतच्या फेरबदलाची सुचना प्रसिद्ध करून हा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र याबाबत कार्यवाही करण्यास अकोला नगर परिषद असमर्थ ठरली होती.

खेळाच्या मैदानाच्या आरक्षण बदलाबाबत एकही सुचना अथवा हरकत प्राप्त झालेली नाही. तसेच याबाबत पुणे येथील नगररचना संचालक कार्यालयानेही फेरबदलाबाबत हरकत घेतलेली नाही. याबाबत कार्यवाही करण्यात येऊन नागरिकांच्या सुविधेसाठी ही खुली जागा विद्यमान खुली जागा दर्शविण्यासाठी फेरबदलाच्या प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली. अकोला शहराच्या मंजूर विकास योजनेतील खेळाचे मैदान वगळून त्याखालील वापर मलकापूरसाठीच्या मंजूर अभिन्यासाप्रमाणे दर्शविण्यात येणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीने या प्रस्तावास मंजुरी दिल्यामुळे विकासकास योग्य त्या प्रयोजनासाठी जमीन वापर करण्याचा मार्ग खुला झाला आहे.

-----o-----

## 'रोहयो'च्या अपूर्ण धडक सिंचन विहिरींसह वर्ग व रद्द केलेल्या विहिरीही पूर्ण करण्याचा निर्णय

राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या धडक सिंचन विहीर योजनेतील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत वर्ग केलेल्या तसेच या योजनेतील रद्द केलेल्या विहिरी पुन्हा धडक सिंचन विहीर योजनेत समाविष्ट करुन पूर्ण करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ व वर्धा या सहा आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये धडक सिंचन विहीर योजना राबविण्यात येत आहे. सद्यस्थितीत या योजनेंतर्गत आतापर्यंत ३५ हजार ९८५ विहिरी पूर्ण झाल्या असून एक हजार ५३४ विहिरी अपूर्ण आहेत. तसेच या योजनेतील रद्द करण्यात आलेल्या विहिरींपैकी पुन्हा सुरु करता येणाऱ्या ८ हजार ७ विहिरी धडक सिंचन विहीर योजनेंतर्गत पुन्हा सुरु करण्यात येतील. अपूर्ण विहिरी पूर्ण करण्यासाठी विभागाकडे २१० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध असून त्यातून ३० जून २०१६ पर्यंत या सर्व विहिरी पूर्ण करण्यात येतील.

धडक सिंचन विहीर योजनेतून नरेगात वर्ग केलेल्या अपूर्ण १० हजार ३२० विहिरी नरेगा अंतर्गत मोहीम स्वरुपात पूर्ण करण्यास व आवश्यकतेनुसार कुशल कामासाठी लागणारा अतिरिक्त निधी राज्य रोहयो निधीतून उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच या कामासाठी जादा मनुष्यबळ उपलब्ध करतानाच या अपूर्ण विहिरी ३० एप्रिल २०१६ पर्यंत पूर्ण करण्यात येतील. या कालावधीत पूर्ण होऊ न शकणाऱ्या विहिरी ३० एप्रिलपासून धडक सिंचन विहीर योजनेमध्ये वर्ग करुन पूर्ण करण्यास व त्यासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----o-----